म. ग्रं. सं. ठाणें

सन

विषय

लेखक

ग्रंथालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

83

कोष

2008

म. ग्रं. सं. ठाणें
विषय कादंबरी
सं. नं.

दराव



किंमत तीन आणे.

# आनंदराव.

मराठी ग्रंथ संग्रहालय
सन १८

## ही बोधपर गोष्ट.

इंग्रजी ग्रंथांतील, एका गोष्टीच्या आधारानें

विनायक कोंडदेव ओक.

ह्यांनीं लिहिली.

अंकीताचा असे अभीमान देवा
समर्पूनी ठेवा असें पायीं.

तुकाराम.

आवृत्ति दुसरी.

मुंबईमध्यें,

"निर्णयसागर" छापखान्यांत जावजी दादाजी ह्यांनीं
छापून प्रसिद्ध केली.

(सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून प्रसिद्धकर्त्यानें
सर्व हक्क आपले स्वाधीन ठेविले आहेत.)

१८८९.

# प्रस्तावना.

ज्या कृत्यांच्या योगानें जनांचें हितच व्हावयाचें, अहित कधीं व्हावयाचें नाहीं, अशीं कृत्यें करण्यांत वेळ खरचिणें, हा आयुष्याचा खरोखर सद्व्यय होय. ह्या कृत्यांतच, मुलांच्या मनांवर नीतीचा ठसा उठविण्याचा प्रयत्न करणें, ह्याची गणना आहे. विद्याचारसंपन्न देशांत हे प्रयत्न पुष्कळ चालले आहेत, आणि त्यांचें [illegible] फार चांगलें आलें आहे. तशा प्रकारचा हा एक अगदीं अल्प प्रयत्न आहे.

नळाचें पाणी शहरांत आणिलेलें असतें, तें जेथें नळांत शिरतें, तेथें तें स्वच्छ केलें ह्मणजे, शहरांतल्या सर्व घरांतलें पाणी स्वच्छ केल्यासारखें होतें. त्याप्रमाणें, जीं नीतितत्त्वें राष्ट्रांतील लोकांच्या मनांत ठसवावयाचीं असतात, तीं मुलांच्या मनांत ठसवावीं, ह्मणजे तें काम अगदीं अनायासें होतें. हें मनांत आणून हा प्रयत्न केला आहे.

हा प्रयत्न परमेश्वर सफल करो.

# आनंदराव.

## भाग पहिला.

पुण्यापासून थोड्या अंतरावर एका नदीच्या कांठीं एक लहानसा गांव आहे. तेथें अमृतराव देशमुख ह्मणून कोणी एक मराठा राहात असे. त्याचें घराणें पूर्वी फार संपत्तिमान् होतें; परंतु, काळ फिरल्यामुळें त्यास दरिद्र प्राप्त झालें होतें. अमृतरावाला दोन मुलगे होते; एकाचें नांव आनंदराव आणि दुसऱ्याचें नांव मन्याबा. ते दोघे चपल आणि बुद्धिमान् होते. ते त्या गांवांतल्या शाळेंत बरेच शिकले. ते थोर कुलांतले आणि स्वभावानें भले होते. तेणेंकरून शाळेवरचा मुख्य शिक्षक माधवराव ह्याचा त्यांजवर फार लोभ असे; आणि तेही त्यास मनापासून भजत असत. आनंदराव चवदा वर्षांचा आणि मन्याबा बारा वर्षांचा झाला, तेव्हां, ह्यांस कोठें तरी सोईस लावून द्यावें, असें माधवरावाच्या मनांत आलें, आणि तो विचार त्या मुलांच्या आईस फार पसंत पडला. कां कीं त्यांच्या प्रपंचाची फार हलाखी होती. त्याविषयीं वाटाघाट चालली असतां, माधवराव ह्यास पुण्याच्या एका मित्रानें असें लिहून पाठविलें कीं, "येथील शिक्षक तयार करण्याच्या पाठशाळेंत बाहेरच्या विद्यार्थ्यांची परीक्षा आजपासून पंध्रा दिवसांनीं होणार आहे. तींत जे उतरतील, त्यांस शिक्षकांच्या जागा मिळतील. ह्यास्तव, तुमचे कोणी विद्यार्थी तयार असल्यास पाठवावे. ते उतरले तर तुह्मांलाही तें मोठें भूषणप्रद होईल."

हें पत्र त्यानें अमृतरावाच्या बायकोला वाचून दाखविलें, आणि असें सांगितलें कीं, "तुमचे दोघेही मुलगे त्या परीक्षेंत उतरण्यासारखे आहेत, त्यांस तिकडे पाठविण्याची तजवीज करावी, हें बरें दिसतें." तें बोलणें तिला मानवलें. कां कीं, घरांत सर्व प्रकारची अडचण झाली होती; त्यामुळें, कोणत्या तरी प्रकारें आपले मुलगे थोडें-

चहुत मिळवायास केव्हां एकदां लागतील असें तिला झालें होतें. तिचें आणि माधवरावाचें बोलणें चाललें असतां, ते दोघे मुलगे बाहेरून घरीं आले. त्यांस त्यांच्या आईनें ह्मटलें, "मुलांनो, ही संधि चांगली आहे. पुण्यास जाऊन शिक्षक होण्याच्या परीक्षेस तुह्मी बसा. तींत उतरलां तर तुह्मांला दोन पैसे मिळायास लागतील, आणि संसार चालविण्यास थोडी मदत होईल."

**माध०**—हो अवश्य जावें. अशी संधि पुन: लवकर यावयाची नाहीं.

तें ऐकून आनंदरावानें तोंड वाईट केलें, आणि मन्याबा त्याच्या कानाशीं लागून कांहीं फुटफुटूं लागला. इतक्यांत त्यांचा बाप अमृतराव तेथें आला. त्याच्या डोक्याचें पागोटें मोडून अगदीं गळयांत आलें होतें; आंगरख्याच्या एका अस्तनींत एक हात घातलेला होता, व दुसरी अस्तनी दुसऱ्या हातामागें लोंबत होती; नेसायाचें धोतर अस्ताव्यस्त झालें होतें; डोळे लाल झाले होते; भिवया वर चढल्या होत्या; चालतांना, पावलोपावलीं डावीउजवीकडे भेलकांड्या जात होत्या; तोंडच्यातोंडांत कांहीं बडबडणें चाललें होतें; आणि घसा बसून शब्द अगदीं खोल गेला होता. त्यास तें सगळें वर्तमान त्याच्या बायकोनें सांगितल्यावर, तो एकाद्या जनावरासारखा आपल्या मुलांच्या आंगावर ओरडून ह्मणाला, "हो, हो, अलबत गेलें पाहिजे. कोणी नानू करील तर खबरदार! शंभर मारून एक मोजीन! ध्यानांत ठेवा! गाढव! पुढें काय भी—भी—भीक मागायाची आहे?"

अमृतरावाचें स्वरूप आणि बोलणेंचालणें असें विलक्षण कशानें झालें होतें, ह्याचा तर्क सहज होण्यासारखा आहे. ते सगळे चाळे दारूचे होते. आधीं इनामकमिटीच्या भक्ष्यस्थानीं पडून त्याचें बहुतेक वतन गेलें होतें, आणि, एकदोन पाटीलक्या आणि थोडेंसें इनाम राहिलें होतें, तें सगळें, राहायाच्या घरासुद्धां, आणि थोडाबहुत डागडागिना होता त्यासुद्धां दारूच्या पायीं रसातळास पोंचलें होतें. तीं सगळीं भाड्याच्या एका लहानशा घरांत राहात असत, आणि,

मोठ्या संकटानें, एक एक दिवस काढीत असत. संसाराचा सगळा भार अमृतरावाची बायको रखमाबाई हिजवर होता. ती मोठी शहाणी, स्वभावानें गरीब, देवास भिऊन वागणारी आणि मोठ्या संभावित कुळांतली होती. आणि ती लहानपणीं आपल्या बापाच्या घरीं लिहावयास आणि वाचायास चांगलें शिकली होती. तिनें पोथ्यापुस्तकें पुष्कळ वाचिलीं होतीं. त्याच्या योगानें तिचेठायीं सहनशीलता आणि विचार हीं पुष्कळ आलीं होतीं. ती रूपानें सुंदर, शरीरानें सडपातळ आणि नाजूक होती. तिला दळणकांडण, स्वैंपाकपाणी, धुणेंधांसणें, झाडसारवण हीं सगळीं कामें..एकटीला करावीं लागत. ती पहांटेस चार घटिका रात्रीस उठे, ती दीड प्रहर रात्र होईपर्यंत एकसारखी काम करीत असे. त्यामुळें ती अगदीं थकून जाई. तरी, तिच्या तोंडांतून "आयाय ओयाय" असें कण्हणें निघालेलें कधीं कोणीं ऐकलें नाहीं. ईश्वरावर भरंवसा ठेवून ती सर्व कामें करी; आणि जीं माणसें परमेश्वरास भजून चालतात, त्यांची उपेक्षा तो कधीं करीत नाहीं, असा तिचा पूर्ण भरंवसा असल्यामुळें, आणि तिचें वागणें तसें असल्यामुळें, तिचें चित्त नेहमीं अगदीं स्वस्थ असे. ती आईची स्थिति पाहून तिच्या मुलांस वारंवार वाईट वाटे. मन्याबा तर आपल्या भावाला वारंवार ह्मणे कीं, "आपले बाबा जर चांगले असते, तर आईला इतके कष्ट पडले नसते. पण काय करावें?"

पुण्यास परीक्षेला पाठवायाची गोष्ट काढिली, तेव्हां आनंदराव ह्याला वाईट वाटलें; ह्याचें कारण असें होतें कीं, त्याला शिक्षकाच्या कामाचा अतिशयित तिटकारा होता. त्या कामांत त्याला घालायाचें कोणीं नुसतें नांव काढिलें कीं त्याचें डोकें उठे; तो एकांतीं आपल्या भावाला ह्मणे, "हमालाचें काम करून पोट भरणें बरें; पण तें पोरांशीं डोकेंफोड करण्याचें काम वाईट; मी तें काम कधींही करणार नाहीं; प्राण गेल्यास करणार नाहीं."

असें जरी होतें, तरी त्याला आईची आणि माधवरावाची भीड तुटेना; आणि बापापुढें ना ह्मणण्याची छाती होईना. ह्मणून त्यानें त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें पुण्यास जाण्याची तयारी केली.

मुलगे परीक्षेकरितां पुण्यास जावयाचे, ह्मणून त्यांना एक दिवस सुटी मिळाली. ते, इतर मुलांबरोबर विटीदांडू खेळत असतां, विटीचा निसटता टोला आनंदरावाच्या उजव्या डोळ्याला लागला. तेणेकरून तो लागलाच सुजून कांहीं वेळपर्यंत लाल झाला होता. पण त्या वेळीं त्याला फार इजा जाणवली नाहीं.

---

## भाग दुसरा.

आनंदराव हा मुलगा स्वभावानें अंमळ उतावळा होता; एवढाच काय तो दोष त्याजमध्यें होता. तो खेरीज करून पाहिलें असतां, त्याच्यासारखा मुलगा क्वचित् सांपडावयाचा. सत्याची आवड, हा त्याजमध्यें एक उत्तम गुण होता. त्याच्या आईच्या चांगल्या सहवासानें आणि उत्तम शिक्षणानें त्याला ग्रंथ वाचण्याची गोडी लागली होती. त्यांत भारतरामायणादि पद्यात्मक ग्रंथांची अभिरुचि त्याला अतिशयित होती. मोरोपंत, मुक्तेश्वर, श्रीधर, वामन ह्यांचे ग्रंथ तो प्रहरांचेप्रहर पाहात बसे. त्याला त्यांचा इतका छंद होता कीं, एकादें कांहीं नवीन चमत्कारिक प्रकरण सांपडलें ह्मणजे, तें वाचतांना त्याला जेवायाला उठायाचीदेखील शुद्धि राहात नसे. चटकदार कितीएक पद्यें त्याला मुखोद्गत होतीं. तो कांहीं साधारण काम करीत असला, ह्मणजे त्यांतला एकादा चुटका त्यानें मोठ्या प्रेमानें आळवून आळवून ह्मणावा, आणि त्याच्या योगानें आपल्या मनाचें आणि जवळच्या माणसांच्या मनांचें रंजन करावें. गाणें आणि कथाकीर्तन ह्यांचा त्याला फार शौक होता. त्याला तालसुर कोणीं कधीं शिकविला नव्हता; तरी, त्यामध्यें कोण कोठें चुकतो, आणि कोण कोठें बहार करितो, हें त्याला केवळ आंगच्या धोरणानें आणि नित्याच्या सहवासानें कळत असे. आणि त्याच्या मनांत असें भरून गेलें होतें कीं, आपणास सतार चांगली वाजवितां येणें हें एक मोठें भूषण आहे, तें आपणास संपादिलें पाहिजे; आणि तें आलें ह्मणजे मग आपल्याला दुसरें कांहीं नको. हें त्याच्या मनांतलें गुह्य पुष्कळ दिवसपर्यंत दुसऱ्या कोणास कळलें नव्हतें.

नेमिलेल्या दिवशीं ते दोघे भाऊ पुण्यास गेले, आणि परीक्षा या-

वयास बसले. त्यांची तयारी चांगली होती; आणि प्रश्न सोपे होते; त्यामुळें त्यांस त्यांची उत्तरें देण्यास मुळींदेखील अडचण पडली नाहीं. परंतु, आपली परीक्षा न उतरली तर बरें, असें आनंदराव ह्यास वारंवार वाटत असे. कां कीं त्याला शिक्षकाचें काम नको होतें. आतां, आपली परीक्षा उतरूं नये असें करण्यास त्याला कांहीं प्रयास करायास नको होते; त्यानें उत्तरें भलभलतीं लिहिलीं असतीं, ह्मणजे तें सहज झालें असतें. पण, तो मुलगा खऱ्या रीतीनें वागणारा होता. ह्मणून त्याच्यानें तसें करवलें नाहीं.

परीक्षेचें काम आटोपल्यावर ते दोघे मुलगे परत आपल्या गांवीं गेले, आणि पूर्वीप्रमाणें शाळेंत जाऊं लागले. आपल्या परीक्षेचा निकाल आपणास कळेल केव्हां, असें मन्याबाला झालें होतें. तो त्याची दररोज वाट पाहात असे. परंतु आनंदराव ह्याला असें वाटे कीं, तो निकाल जितका लांबणीवर पडेल तितका बरा, आणि आपली परीक्षा न उतरली तर फार उत्तम. असें होतां होतां कांहीं दिवस लोटत चालले. मुलांस परत येऊन ज्या दिवशीं बरोबर वीस दिवस झाले, त्या दिवशीं टपालांतून माधवराव ह्यास एक पत्र आलें; त्यांत, त्या दोन्ही मुलांची परीक्षा उतरली. ह्मणून मजकूर होता. तें पत्र लागलेंच त्यानें त्यांच्या घरीं नेऊन त्यांची आई रखमाबाई हीस वाचून दाखविलें. तें ऐकून तिला फार संतोष झाला. मन्याबाचा हर्ष तर त्रैलोक्यांत मावेना. पण, त्या वर्तमानाच्या योगानें आनंदराव ह्याचें मन इतकें दुःखी झालें कीं, तें सांगतां पुरवत नाहीं. त्यानें कपाळाला आठ्या घातल्या आणि तोंड अगदीं वाईट केलें.

मग, जेवणें आटपल्यावर ते दोघे भाऊ बाहेर फिरायास गेले. आनंदराव ह्यास अतिशयित वाईट वाटलें होतें, हें मन्याबाच्या लक्षांत आलें होतें, आणि त्याविषयीं त्याचे मनांत त्याजवळ बोलावयाचें होतें. ह्मणून त्याविषयीं त्यानें हळूच बोलतां बोलतां ती गोष्ट काढिली, आणि त्यास समाधानाच्या अनेक गोष्टी सांगितल्या. तो ह्मणाला, " दादा, परमेश्वर अत्यंत थोर आहे, आणि तो आपल्या भक्तांच्या प्रार्थना ऐकून त्यांप्रमाणें सर्व गोष्टी घडवून आणि-

तो, असें आई आपणांस वारंवार सांगत असते, तें तुझ्या लक्षांत नाहीं काय?" आनंदरावानें उत्तर दिलें, "होयरे मन्या, तें मला सगळें आठवतें; आणि पुस्तकांतल्या तशा कितीएक गोष्टी मला-ही ठाऊक आहेत. पण उपयोग काय? माझी ही परीक्षा उतरूं नये आणि माझ्या कपाळाला तें पंतोजीचें काम येऊं नये, ह्मणून मीं, फार नाहीं पण निदान शंभर वेळ देवाची प्रार्थना केली असेल. पण तिचें कांहींएक फळ झालें नाहीं. प्रारब्धीं असतें तें चुकत नाहीं, एवढें खरें." हे शब्द तोंडांतून निघत असतां त्याच्या डोळ्यांतून खळखळां अश्रुधारा वाहूं लागल्या. आणि त्याच्यानें पुढें बोलवेनासें झालें. तरी, दहापांच पळें दम खाऊन तो आपल्या भावाला ह्मणाला, "बरें तें असो सध्यां; तूं आतां आधीं घरीं जा; आई तुला हाक मारील. मी ह्या पुढच्या टेंकडीवरच्या झाडांचीं कांहीं चांगलीं चांगलीं फुलें माळा आणि गजरे करायास घेऊन येतों. तरी मला फार वेळ लागावयाचा नाहीं. आईला सांग कीं हा मी आलोंच."

त्याप्रमाणें मन्याबा परत घरीं गेला, आणि आनंदराव त्या टेंकडीवर गेला. ह्या झाडावर चढ, त्या झाडावर चढ, हीं फुलें काढ, तीं फुलें तोड, असें करितां करितां, आणि एका उंच झाडावरून खालच्या शेतांची आणि हिरव्यागार कुरणांची अप्रतिम शोभा मोठ्या आनंदानें पाहात असतां, आनंदरावाचा पाय घसरला, आणि तो धाडकन् त्याच्या खालच्या एका खोल खांचाडांत पडला; आणि त्याच्या मागोमाग त्याच्या आंगावर त्या झाडाची एक लहानशी फांदी, त्याचाच धक्का लागून तुटून पडली. त्यामुळें त्यास त्या जागेवरून उठवेना; तो तेथें तसाच कण्हत पडला.

इकडे घरीं रखमाबाई आणि मन्याबा हीं त्याची वाटपाहात बसलीं. एक तास गेला, दोन तास गेले, दिवस मावळायाची वेळ झाली, तरी आनंदरावाचा ठिकाण नाहीं. तेव्हां रखमाबाई मन्याबाला ह्मणाली, "अरे बाळा, तूं त्या टेंकडीकडे जाऊन पाहा तरी त्याला एकदां. कांहींतरी रोजगार पाहण्यास मी पुण्यास जाईन, असें तो मजजवळ नेहमीं ह्मणत असतो; तिकडे तर तो गेला नसेलना? जा

बाळा, ऊठ लवकर. " तें ऐकून मन्याबा आंगरखा टोपी घालून त्या टेंकडीच्या पायथ्याशीं गेला, आणि फुलझाडें होतीं तेथें इकडे तिकडे न्याहाळून पाहूं लागला. इतक्यांत तेथें कोणी कण्हल्यासारखें त्याला भासलें, आणि ज्या बाजूनें तें ऐकूं आलें, त्या बाजूनें तो जरा पुढें सरला. आणखी दोन पावलें तो पुढें गेला, तों, आनंदराव त्या खांचाडांत पडला आहे, त्याच्या आंगावर ती फांदी पडली आहे, आणि डोक्यास दगड लागून त्या खोंचींतून रक्त वाहात आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. तें पाहून त्याला अतिशयित वाईट वाटलें. आपले भावास त्या संकटांतून काढावें, अशी त्याला फार इच्छा झाली. परंतु, तो अशक्त असल्यामुळें तें त्याच्यानें होईना. तेव्हां तो मोठ्या विचारांत पडला. पुढें काय करावें, हें त्याला सुचेना. तो आपल्या ठिकाणीं मोठी धडपड करीत होता, इतक्यांत, त्या खांचाडाच्या वरच्या बाजूनें जो रस्ता जात होता, त्यावरून एक गाडी जात आहे, असें त्याला ऐकूं आलें तो लागलाच वर गेला, आणि पाहूं लागला तों, आपला गुरु माधवराव हा आपल्या गाडींत बसून जात आहे, असें त्याला दिसून आलें. त्यानें त्याला विचारिलें, " मन्याबा, तूं रे ह्या वेळेस येथें कशाला आलास ? " तें ऐकून त्या मुलानें त्याला सगळें वर्तमान सांगितलें. तेव्हां माधवराव मोठ्या त्वरेनें आपल्या गाडींतून उतरून त्या खळग्यांत गेला, आणि आनंदरावाला त्यांतून वर काढून सावध करून मन्याबाला ह्मणाला, " तूं पळत पळत घरीं जाऊन हें सगळें वर्तमान आपल्या आईला सांग, इतक्यांत मी ह्याला घेऊन येतों. "

त्याप्रमाणें मन्याबा घरीं गेला आणि त्याच्या मागोमाग आनंदराव ह्यास माधवरावानें घरीं नेलें. तेव्हां अमृतरावाची स्वारी कलालखान्यांतून परत आली नव्हती. आनंदरावाचा पाय मोडला होता, तो नीट लावून बांधण्यास त्यांनीं लागलेंच वैद्यास बोलावून आणिलें, आणि त्याची सर्व तजवीज बरोबर केली. आणि मग माधवराव तेथून निघून गेला.

पाय बांधणें आणि जेवणेंखाणें आटोपल्यावर आनंदराव आपल्या बिछान्यावर पडला असतां, आपल्या भावास ह्मणाला, " तूं कांहीं

ह्मण; पण परमेश्वर आमच्या प्रार्थना ऐकून त्यांप्रमाणें गोष्टी घड-विती, असें जें आई आपणांस वारंवार सांगते, त्याचा अनुभव मला येत नाहीं. शिक्षकाचें काम माझ्या वांट्यास येऊं नये ह्मणून मीं किती वेळां त्याच्या प्रार्थना केल्या ह्मणून सांगूं? पण त्यांचा कांहीं-एक उपयोग झाला नाहीं." मन्याबा ह्मणाला, "दादा, अद्याप त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं, ह्यावरून पुढें तो खचीत व्हावया-चा नाहीं, असें समजायाचें काय?" इतक्यांत, दाराच्या बाहेरच्या बाजूकडून कोणीं ह्मटलें, "उपयोग व्हावयाचा नाहीं, असें कधीं-ही व्हावयाचें नाहीं, बाबा." हा आवाज ओळखीचासा वाटला, ह्मणून त्या दोघां मुलांनीं चटकर त्या दरवाजाकडे पाहिलें. तों मा-धवराव आंत आला. त्याला किंचित् लाजल्यासारखा होऊन मन्याबा तेथून चटकर उठून बाहेर गेला. आणि मग आनंदरावाचें आणि माधवरावाचें बोलणें झालें, तें असें:—

**माध०**—आनंदराव, परमेश्वर आपल्या प्रार्थना ऐकत नाहीं, हें तूं कसें ह्मणतोस? तो आपला सर्वांचा बाप आहे. तो आपल्या प्रार्थना ऐकणार नाहीं, असें कसें होईल? आणखी, तो अत्यंत दयाळू आहे.

**आनं०**—असेल दयाळू; मी नाहीं ह्मणत नाहीं. पण, तो आईइतका दयाळू नाहीं खचीत.

**माध०**—तुला असें त्यानें खळग्यांत पडूं दिलें आणि तुझा पाय मोडूं दिला, ह्मणून तूं असें ह्मणतोस कीं काय?

**आनं०**—मला वेदना झाल्या, त्या माझ्या आईच्यानें पाहवल्या नाहींत. तिला अतिशयित दुःख झालें.

**माध०**—तसें देवाला झालें नाहीं, असें तूं समजतोस काय?

**आनं०**—बरें, जर त्याला तसें दुःख झालें खरें ह्मणावें, तर त्यानें त्या वेदना मला सोसायास कां लाविलें?

**माध०**—आतां मी तुला एक प्रश्न विचारितों, ह्याचें उत्तर तूं मला दे. तुला मघाशीं घरीं आणिल्यावर तुझ्या आईनें लागलेंच वैद्यास बोलवायास पाठविलें. तेव्हां तिला खचीत ठाऊक होतें

कीं, तो वैद्य जेव्हां तुझ्या पायाचें हाड बरोबर बसवून बांधील, तेव्हां तुला अतिशयित दुःख सोसावें लागणार आहे. त्याप्रमाणें तुला खरोखर दुःख सोसावें लागलें. तें न लागावें ह्मणून, तुझ्या आईनें तुझा पाय जर तसाच राहूं दिला असता, आणि वैद्याला बोलावून आणिलें नसतें, तर तिचा ममताळूपणा अधिक दिसून आला असता, किंवा, तुला अतिशयित दुःख झालें अशी जी व्यवस्था तिनें केली, तिजवरून तिचा ममताळूपणा अधिक दिसून आला? सांग बरें!

**आनं०**–ह्यांत काय विचारावें? तिनें जी व्यवस्था केली, तिच्या योगानें तिचा फार ममताळूपणा प्रकट झाला. तीच कशाला, पण स्वतः मी देखील वैद्याला बोलावून आणून, सगळें दुःख सोसून, आपला पाय बांधविला असता. आणि तसें मी न करितों, तर मग माझ्या मूर्खपणाचा कळस झाला असता.

**माध०**–समज. तूं अगदीं लहान, असमंजस असतास, तर तूं कदाचित् तसें न करतास; कारण, पाय बसविण्याच्या दुःखाची किंमत तुला कळली नसती. आणि कदाचित्, अशा वेळेस तुझी आई तुला अत्यंत क्रूर वाटली असती. कां कीं, पाय बांधितेवेळीं तूं जरी कितीही रडला असतास, आणि ओरडला असतास, तरी तिनें वैद्याला नको ह्मटलें नसतें.

**आनं०**–होय खरेंच. पण, त्या दुःखापासून मला पुढें किती सुख होणार, हें तिला पक्कें ठाऊक असल्यावरूनच तिनें तसें करूं दिलें असतें.

**माध०**–होय ना? तर मग देवाविषयीं अगदीं तसेंच आहे. आपण सर्व त्याचीं अज्ञान मुलें आहों, आणि तो आपणां सर्वांचा सर्वज्ञ आणि अत्यंत दयाळू असा बाप आहे. आमचें हित कशांत आहे, हें आह्मांपेक्षां त्याला अधिक ठाऊक आहे, आणि तें करण्याचें सामर्थ्य त्याचे ठायीं आहे. जें जें आह्मी मागतों, तें तें त्यानें आह्मांस द्यावें, हें बरें नाहीं. कारण, अज्ञानामुळें, ज्यापासून आमचें अहित व्हावयाचें, असें कांहीं कदाचित् आह्मी मागूं. मुलानें फार विनवणी करून किंवा हट्ट धरून जर आईजवळ तीक्ष्ण धारेचा चाकू

किंवा एकादा विषारी पदार्थ मागितला, तर तो तिनें त्याला द्यावा काय ? आणि तिनें त्याला तो न दिला, ह्मणून त्या आईला त्यानें निर्दय ह्मणावें, हें योग्य आहे काय ?

**आनं०**—नाहीं, नाहीं. अशा कृत्याबद्दल आईला निर्दय कसें ह्मणावें ? पण मला थोडेंसें विचारावयाचें आहे. आपण एकादि वस्तु परमेश्वरापाशीं प्रार्थना करून जेव्हां मागतों, तेव्हां तिजविषयीं, होय किंवा नाहीं, असें कांहीं तरी एक उत्तर आपणांस मिळावें कीं नाहीं ?

**माध०**—अवश्य मिळावें, आणि मिळतें ह्याविषयीं संशय नाहीं.

**आनं०**—पण, नेहमीं उत्तर मिळतेंच, असें मला वाटत नाहीं.

**माध०**—उत्तर मिळालें असें वाटणें, किंवा उत्तर मिळालें नाहीं असें वाटणें, हें आपल्या समजुतीवर आहे. आपण जें मागतों त्याविषयींचें उत्तर आपणांस अमुक प्रकारें मिळावें, असा आपल्या मनाचा ग्रह झालेला असतो; त्याप्रमाणें आपल्या प्रत्ययास आलें, ह्मणजे उत्तर मिळालें असें वाटतें; आणि त्याहून कांहीं वेगळा प्रकार झाला, ह्मणजे उत्तर मिळालें नाहीं असें वाटतें. परंतु, आपली इच्छा परमेश्वराच्या हेतूप्रमाणेंच नेहमीं असते, असें नाहीं. प्रार्थना ऐकण्याचे आणि त्या सफल करण्याचे त्याचे जे मार्ग आहेत, ते अत्यंत पवित्र आणि आपणां सर्वांस अत्यंत सुखावह असे आहेत. पण, आपली बुद्धि कोंती असल्यामुळें ते आपणांस कळत नाहींत. एवढ्यावरून तो आपल्या प्रार्थना मुळींच ऐकत नाहीं, असें आपणांस वाटतें. पण ती केवळ भ्रांति आहे. आपणास मिळण्याजोगी आवश्यक वस्तु मागण्याकरितां आपण प्रार्थना करीत असावें, हा आपला धर्म आहे.

माधवराव उठून गेल्यावर आनंदराव आपणाशींच ह्मणाला, "आतां प्रार्थना करून कांहीं उपयोगी नाहीं."

---

## भाग तिसरा.

ह्या गोष्टीस पंधरा दिवस लोटले, आणि आनंदरावाची प्रकृति बरी होत चालली. त्याचे शाळेंतले सोबती दररोज संध्याकाळीं त्याजकडे येऊन बसत, आणि त्याला शाळेंत झालेल्या सर्व गोष्टी सांगत. त्यांत

बळवंत ह्मणून त्याचा एक मित्र होता, तो त्याला एके दिवशीं संध्याकाळीं ह्मणाला, "अरे, तुला पाठविण्याची तयारी अद्याप आपले गुरुजी करीत नाहींत, हें कसें? तुजवर त्यांची इतराजी तर नाहींना झाली?"

आनं०—नाहीं, त्यांची इतराजी होण्यासारखें मीं कांहीं केलें नाहीं, आणि कधीं करणार नाहीं. ते आमचे खरे हितकर्ते आहेत. आह्मांवर त्यांचे उपकार पुष्कळ झाले आहेत. त्यांच्या मर्जीबाहेर मी कधींही वागणार नाहीं.

हें बोलणें चाललें होतें, इतक्यांत माधवराव तेथें आला. त्याला पाहातांच, मोठ्या मर्यादेनें बळवंत तेथून उठून गेला. नंतर आनंदरावानें त्यास विचारिलें, "आह्मांस शिक्षकाचें काम करण्यास पाठविण्याची तयारी झाली काय?"

माध०—नाहीं अद्याप. त्याविषयीं मला तुला आधी थोडें विचारावयाचें आहे. मला वाटतें तुला शिक्षक व्हावयास नको आहे मनापासून.

आनं०—नको कां बरें? आपण असें कां ह्मणतां. मजकडून कांहीं अपराध झाला आहे काय?

माध०—अपराधबिपराध कांहीं नाहीं, पण मला शाळेंत समजलें कीं तुला शिक्षकाचें काम आवडत नाहीं, त्यापक्षीं तें काम तूं पतकरूं नये हें बरें. जें काम ज्याला आवडत नाहीं, तें त्याला करायाला सांगून काय फायदा? वाटोळें भोंक चौकोनी खुंटी बसवून बुजविण्याचा प्रयत्न करणें हें बरें नाहीं. आतां मला ह्यांतलें खरें काय तें सांग बरें.

आनं०—(डोळ्यांत पाणी आणून) होय. आपण ह्मणतां तें कांहीं खोटें नव्हे. पण, तें काम जर मला करावेंच लागलें, तर मी तें मनापासून करीन. त्यांत कुचराई करणार नाहीं.

माध०—पण तें तुला फार जड जाईल, नाहीं बरें!

आनं०—जड तर जाईलच. पण करायाचें काय?

माध०—तर मग तूं परीक्षेला तरी कशाला गेलास?

**आनं०**-न जाऊन काय करूं? बाबांपुढें-फार काय सांगूं. परीक्षा उतरूं नये ह्मणून कितीएक वेळां परमेश्वराची प्रार्थना देखील केली.

**माध०**-हां हां! परमेश्वर प्रार्थना ऐकत नाहीं ह्मणून त्या दिवशीं तूं ह्मणत होतास, तें हेंच वाटतें. बरें तर, आतां मी तुझें नांव परीक्षेंत उतरलेल्या मुलांच्या यादींतून कमी करण्याची तजवीज करितों. तूं कांहीं काळजी करूं नको. तुला शिक्षकाचे कामावर जावें लागावयाचें नाहीं. पण, ऐक नीट लक्ष देऊन, मी काय सांगतों तें. परमेश्वरानें तुझी प्रार्थना त्या प्रकारें ऐकिली नाहीं, पण ह्या प्रकारें ऐकिली. ह्यावरून तो प्रार्थना ऐकितो, हें तूं नेहमीं लक्षांत ठेव.

**आनं०**-आपण हें मोठें काम केलें माझें. ह्याबद्दल मी आपले उपकार मानितों. पण, हें समजल्यावर बाबा भारी रागावतील, ह्याला काय करावें? मला आतां कांहीं दुसरा धंदा पाहिला पाहिजे. आपण माझी कोठें सोय करून द्याल तर बरें होईल.

**माध०**-मी तुझ्या बापाला ह्याविषयीं सांगेन समजूनं तो तुला रागें भरणार नाहीं. भिऊं नको. आणि तूं उठता होतो आहेस, इतक्यांत कोठें कांहीं थोडीशी सोय पाहून ठेवितों. पण, मी ऐकतों, तुझ्या मनांत सतार वाजवायास शिकावयाचें फार आहे.

**आनं०**-( किंचित् हंसून ) होय तें खरें आहे.

नंतर माधवराव उठून गेला. मग मन्याबा त्याच्या बिछान्याशीं आला. त्याला आनंदराव ह्मणाला, " परमेश्वर आपल्या प्रार्थना ऐकतो, आणि त्या योग्य असल्या ह्मणजे, कोणत्या तरी प्रकारें त्या मान्य करितो, ह्याविषयीं आतां माझी खातरी झाली आहे. आतां मला शिक्षक व्हायास नको. "

त्याचें आणि माधवरावाचें जें बोलणें झालें होतें तें सगळें मन्याबाला तपशीलवार सांगून तो त्याला शेवटीं ह्मणाला, " परमेश्वर आईसारखा खरोखर दयाळू आहे, हें मी आतां कधींही विसरणार नाहीं."

ह्या गोष्टीस महिना दीड महिना लोटला. आनंदराव चांगला हिंडता फिरता झाला. त्यानें शिक्षकाचें काम करण्याचें नाकारिलें,

असें अमृतरावास कळलें तेव्हां त्यानें त्यावर शिव्यांची लाखोली वाहिली, आणि "घराबाहेर निघून जा आणि पाहिजे तसें पोट भर," असें त्याला सांगितलें. आनंदराव त्याच विचारांत होता; आणि, आपल्या आईला जे इतके कष्ट पडतात, त्यांचें कांहीं अंशीं तरी आपले हातून निवारण व्हावें, असें त्याच्या मनांत रात्रंदिवस घोळत होतें. परंतु, माधवरावाकडील कांहींच निरोप त्याला येईना. तो येईल केव्हां, आणि मी पुण्यास जाऊन कांहीं कामधंदा पतकरीन केव्हां, असें त्याला झालें होतें. वाट पाहातां पाहातां एके दिवशीं त्याजकडून त्याला असा निरोप आला कीं, पुण्यास एका घड्याळजीच्या कारखान्यांत तुला सोय पाहिली आहे, तेथें तुला एक महिनाभर तूर्त ह्मणून काम करावें लागेल, आणि एक महिनाभर तूं तें काम चांगलें केलेंस, ह्मणजे तुला ती जागा कायम मिळेल; आणि तो घड्याळजी तुला घड्याळें करायास शिकवील. त्याचें उत्तर लवकर गेलें नाहीं, ह्मणून माधवराव स्वतः त्याजकडे येऊन ह्मणाला, "कां, पुण्यास जायाचें कीं नाहीं?"

**आनंद०**—बरें आहे. नाहीं कोण ह्मणतो? जातों.

**माध०**—जातों असें हळू हळू कां? घर सोडावेंसें वाटत नाहीं वाटतें.

**आनं०**—नाहीं नाहीं. तसें कांहीं नाहीं. मी पुण्यास जाण्यास तयार आहें; घड्याळजी होणें कांहीं वाईट नाहीं. चांगलें आहे.

त्याचें बोलणें असें डळमळीत पडण्याचें कारण एवढेंच होतें कीं, माधवराव आपणास कोठें सतार शिकण्याची सोय लावून देईल, असें त्याला फार वाटलें होतें, तें सारें व्यर्थ गेलें. तो अगदीं निराश झाला होता. परंतु, माधवरावापुढें त्याच्यानें कांहीं बोलवेना; ह्मणून तो घड्याळजीचें काम शिकण्यास तयार झाला.

त्याप्रमाणें तो पुण्यास गेला, आणि घड्याळें करण्याच्या कारखान्यांत चाकरीस राहिला. त्या कारखान्यांच्या मालकाचें नांव उद्धवराव असें होतें. तो गृहस्थ स्वभावानें फार शांत, परोपकारी, सत्यवादी आणि धार्मिक होता. आणि माधवरावावर त्याचा फार लोभ

होता. त्यामुळें, त्याच्या सांगण्यावरून तेथें आनंदरावाची सर्व सोय यथास्थित झाली. त्याचें कामकाज चांगलें चाललें. एक आठवडा लोटल्यावर, त्यानें मन्याबास आपल्या सगळ्या हकीकतीचें पत्र लिहिलें. तें ऐकून रखमाबाईस फार संतोष झाला. त्याला काम कसें काय येतें, तें पाहण्याचा त्याचा पहिला महिना उत्तम प्रकारें गेला; आणि ती जागा त्याला कायम मिळाली.

सुमारें एक वर्ष लोटलें. तरी, आनंदरावाच्या मनाचा जो नाद होता, तो कमी झाला नाहीं. तथापि तो आपलें काम लक्ष लावून करी, त्यामुळें त्याला कोणी ब्र बोलत नसे. एवढेंच केवळ नव्हे; तर, तो मुलगा प्रामाणिक होता, ह्मणून त्याजवर उद्धवरावाची फार मर्जी बसली. परंतु, इकडे त्याच्या घरीं वेगळाच प्रकार झाला. अमृतरावाचें दारूचें व्यसन अतिशयित वाढलें. त्यामुळें त्याचे हातून कोणतेंही काम नीटपणें होईना. ह्मणून, त्याला जो कांहीं थोडासा उद्योग होता, तो गेला, आणि त्याला घरीं बसावें लागलें. त्यामुळें कुटुंबांत विपत्ति अधिकच आली. कां कीं, तो, स्वतः अनुत्पन्न झाल्या कारणानें, घरच्या वस्तु दारूच्या भरीस घालूं लागला.

अशी स्थिति झाली, तेव्हां रखमाबाईस आणि मन्याबास फार दुःख झालें; आणि पुढें दिवस कसे निभतील, अशी त्यांस मोठी काळजी पडली. त्या सुमारास थोडी रजा घेऊन, आनंदराव त्यांस भेटावयास घरीं आला. त्यास पाहून रखमाबाईस आणि मन्याबास फार आल्हाद झाला. त्यांनीं त्याला त्याचें सगळें वर्तमान विचारून घेतलें, परंतु आपली गृहस्थिति त्यास कळूं दिली नाहीं. कां कीं, तिच्या योगानें त्याच्या मनाला फार दुःख होईल, हें त्यांस ठाऊक होतें.

तरी त्यांची विपत्ति आनंदरावाच्या लक्षांत येण्यास उशीर लागला नाहीं. रखमाबाईस धड असें काय तें एकच लुगडें होतें; तें ती कोठें बाहेर जावयाचें झालें तर नेसे, आणि घरांत फाटकीं तुटकीं लुगडीं नेसे; घरांतलें बहुतेक सामान नाहीसें झालें होतें; स्वैंपाकास पुरण्यापुरतीं देखील भांडीं नव्हतीं; मन्याच्या आंगांत एक मळकट आणि

फाटकी बंडी होती; आणि घरांत आठ दिवसांस पुरण्यापुरतें सुद्धां धान्य नव्हतें; हें पाहून त्याला अतिशयित वाईट वाटलें. तरी, रखमाबाईनें किंवा मन्याबानें त्याविषयीं त्याजवळ चकारशब्द काढिला नाहीं.

विपत्ति आणि तींत सहनशीलता, अशी आपल्या आईची दीनावस्था पाहून आनंदरावाच्या कोमल अंतःकरणास फार दुःख झालें. पण तें त्यानें बाहेर दाखविलें नाहीं. तरी, आपणाकडून जितके श्रम करवतील, तितके करून तिला साह्य करावयाचें, असा त्यानें निश्चय केला.

पुण्यास आपल्या कामावर परत आल्यावर आनंदरावानें आपल्या घरची सगळी हकीकत उद्धवरावास सांगितली. ती ऐकून त्याचेंही मन त्यांविषयीं फार दुःखी झालें. परंतु ह्यांस साह्य करण्याचें सामर्थ्य त्याला नव्हतें. तो आनंदरावाला ह्मणाला, "तुझें नित्याचें जें काम आहे, तें केल्यावर थोडासा वेळ राहातो, तो जर तूं आणखी काम करण्यांत घालविशील, तर त्याबद्दल मी तुला वेगळा पगार देत जाईन." तें त्याचें ह्मणणें आनंदरावानें कबूल केलें, आणि त्याप्रमाणें सायंकाळचे साहा वाजल्यापासून सात वाजत तोंपर्यंत तो अधिक काम करूं लागला.

असा एक महिना लोटला. त्या ज्यास्ती कामाबद्दलचा वेगळा पगार आणि नित्याच्या कामाबद्दलचा पगार मिळून एकंदर पंधरा रुपये त्या महिन्याचे त्याला मिळाले. ते हातीं आल्यावर, त्यांतले पांच रुपये आपल्या खर्चास ठेवून, दोन रुपयांचें एक हलकेंसें लुगडें आपल्या आईकरितां, आणि आठ आण्यांचें एक धोतर मन्याबाकरितां खरीद करून, त्यानें त्यांचें एक गांठोडें बांधिलें, आणि साडेसात रुपये रोख एका कागदाच्या पुडींत घालून त्यांत घातले. तें गांठोडें एका गड्याच्या हवालीं करितांना त्याच्या मनाला जो उल्हास झाला, त्याचें वर्णन करितां येत नाहीं. तो आपल्या मनांत ह्मणाला, "ह्या वस्तु पाहून आईला आणि मन्याला किती हर्ष होईल बरें? मी बाहेर पडल्यासारखें मला एवढें तरी साह्य माझ्या आईला करितां

आलें, ही परमेश्वराची मजवर मोठी कृपा होय. देवा, मजकडून असेंच साह्य तिला होऊं दे."

तो गडी एका श्रीमंत गृहस्थाचा चाकर होता; आणि त्याला त्याच्या यजमानाच्या कांहीं कामाकरितां त्या गांवीं जावयाचें होतें. तें आनंदरावाचें गांठोडें फुकट नेऊन पोंचविण्याचें त्यानें पतकरिलें. त्या गांठोड्यावर त्यानें आपल्या आईच्या नांवाची चिठी मारिली होती, आणि शिवाय तिला वेगळें एक पत्र दिलें होतें. तीं दोन्ही घेऊन तो गडी पुण्याहून निघाला; तो, त्या गांवीं, ज्याकडे यजमानाचें काम होतें, त्याकडे येऊन दाखल झाला. तेथें कोणी माणूस फार आजारी होतें. त्यांमुळें त्यास तें गांठोडें पोंचवायाचें एकीकडे ठेवून इतर माणसांबरोबर, त्या रोगी माणसाच्या खटपटींत गुंतावें लागलें.

---

## भाग चवथा.

ह्याप्रमाणें इकडे व्यवस्था झाली असतां, तिकडे रखमाबाईच्या येथें काय प्रकार घडला, तो पाहिला पाहिजे. ती भाड्याच्या घरांत राहात होती, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. त्या घराचा मालक गणपतराव हा तिजकडे आला, आणि, तीन महिन्यांचें तुंबलेलें भाडें साडेसात रुपये, तिजपाशीं मागूं लागला. परंतु तिजपाशीं शपथ वाहण्यास एक पैसा देखील नसल्यामुळें, तिनें मोठ्या आर्जवानें त्याच्या हातीपायीं पडून दोन दिवस वागवून घेण्यास विनंती केली. परंतु, तो पक्का सराफ होता. त्यानें निष्ठुरपणानें तिला साफ असें उत्तर दिलें कीं, "बरें, दोन दिवस मी थांबतों. पण पुनः दोन दिवसांनीं मी येईन तेव्हां जर मला सगळे दाम मिळाले नाहींत, तर मात्र—"

असें बोलून तो उठून गेला. त्याच्या तगाद्याविषयीं रखमाबाईला मोठी चिंता पडली. पण करते काय? तिचा हात चालेना. दोन दिवस लोटले, आणि तिसरे दिवशीं प्रातःकाळीं गणपतराव भाडें मागावयास आला. त्याजकडे पाहून रखमाबाईला फार भय वाटलें,

आणि वाईट वाटून तिच्या डोळ्यांतून पाणी वाहूं लागलें. तिनें हात जोडिले; तें सगळें वर्तमान पाहून, गणपतरावाच्या हृदयांत दया तर उत्पन्न झाली नाहींच; पण त्याला अतिशयित क्रोध आला, आणि तो ह्मणाला, "हा मी चाललों. आतां सरकारचा कारकून आणून तुमच्या घरांतल्या वस्तु विकून मी आपले पैसे वसूल करून घेतों पहा."

असें ह्मणून तो चालता झाला. तेव्हां तर रखमाबाईस दे माय धरणी ठाय झालें. तिचा तो अतिशयित शोक पाहून मन्याबाला-ही रडें कोसळलें. काय करतील बिचारीं! तीं मायलेंकरें धाय मोकलून रडत बसलीं. कारण कीं, आज आपल्या घरांन्तीं राहि-लींसाहिलीं भांडीं आणि आंगावरचीं जुनींपानीं चिरगुटें जाऊन अब्रू खचीत जाणार, असें त्यांस वाटलें.

परंतु, गरीबाची काळजी परमेश्वराला असते. तो आपल्या भ-क्तांची उपेक्षा कधींही करीत नाहीं. गणपतराव, बरोबर शिपाई कारकून घेऊन तेथें आला, आणि आतां सामानसुमान पुढें आणून त्याची याद करणार, इतक्यांत तो गडी, तें गांठोडें हातांत घेऊन त्या ठिकाणीं आला. त्यानें तें गांठोडें मन्याबाच्या हातांत देऊन आणि पत्र पुढें टाकून ह्मटलें, " हें पत्र वाचा आणि आपलें गांठो-डें सोडून पाहा; ह्मणजे मला लवकर जायाला बरें पडेल." गांठो-ड्यावरच्या चिठीचें अक्षर आनंदरावाच्या हातचें होतें, तें मन्यानें तेव्हांच ओळखिलें, आणि आपल्या आईला ह्मटलें, " आईग, हें दादाकडून आलें आहे. हें मी सोडून पाहूं काय? आईनें सोड ह्मणून सांगितल्यावर त्यानें तें लागलेंच सोडिलें, आणि आंत पाहि-लें तों, त्यांत एक हलकेंसें लुगडें आणि एक धोतर अशीं दोन वस्त्रें त्याच्या दृष्टीस पडलीं तें लुगडें वर उचलून तो आईच्या हातांत द्या-वयास लागला तों, तें मध्येंच, गणपतरावाच्या इशाऱ्यावरून, सरका-रच्या शिपायानें हिसकून घेतलें, आणि आपलेजवळ ठेवून यादींत टि-पलें तेव्हां रखमाबाईला आणि मन्याला किती वाईट वाटलें, तें सांगतां येत नाहीं! तीं दोघें एकमेकांकडे पाहात स्तब्ध राहिलीं, तों

त्या शिपायानें तें धोतर उचललें, आणि तें तो त्या लुगड्यावर आपणा-पुढें ठेवूं लागला; इतक्यांत त्यांतून पटकर एक कागदाची पुडी भुईवर पडली, आणि तींत कायसें खुटकर वाजलें. ती पुडी त्या कारकुनानें उघडिली, आणि पाहिलें तों तींत साडेसात रुपये रोख होते.

ते साडेसात रुपये पाहतांच, गणपतराव, तो कारकून आणि तो शिपाई, ह्यांची सगळी चळवळ बंद झाली. ते कांहीं वेळपर्यंत अगदीं स्तब्ध राहिले आणि मग गणपतराव रखमाबाईकडे वळून, कांहींसा लाजल्यासारखा होऊन ह्मणाला, " आमची झाली भरती एवढ्या रुपयांनीं; आतां आह्मांला अधिक खटपट करण्याचें कारण राहिलें नाहीं. हें संभाळा आपलें सगळें सामान. आह्मी जातों. " असें बोलून, तो आणि ते दुसरे दोघेजण तेथून उठून निमूटपणीं घराबाहेर चालते झाले. तें सगळें वर्तमान पाहून रखमाबाईस अत्यंत आल्हाद झाला. भुकेल्यास अन्न मिळावें अथवा तान्हेल्यास पाणी मिळावें, असें तें साह्य तिला आनंदरावाकडून आलें. ती मन्याला जवळ बोलावून त्याच्या पाठीवरून हात फिरवून ह्मणाली, " पाहिलेंसना बाळा हें. हें तुझ्या भावानें पाठविलें बरें. परमेश्वरा त्या बाळास तूं आशीर्वाद दे आणि त्याचें कामकाज चांगलें चालूं दे. तुझी कृपा आह्मां गरीबांवर निरंतर असो. "

मग तें पत्र उचलून मन्यावानें वाचलें. त्यांत असें होतें:—" पोटगीस थोडासा पैसा ठेवून, बाकी राहिला, त्यांतले साडेसात रुपये रोख, आणि बाकीच्या पैशांचें लुगडें एक व पंचा एक, असें सामान गांठोड्यांत घालून पाठविलें आहे. पावल्याचें उत्तर पाठवावें. तुला साह्य करण्याकरितां माझ्यानें होतील तितके कष्ट मी करीन. पण, आई, मी कितीही जरी तुला साह्य केलें, तरी तुझे उपकार माझे हातून फिटतील काय? नाहीं बरें. तुझे उपकार माझ्यानें कधींही फेडवणार नाहींत. "

गांठोडें पोंचल्याचें उत्तर लवकर आलें नाहीं, ह्मणून त्याविषयीं आनंदराव ह्याला मोठी काळजी पडली; तो वाट पाहात होता. असे दाहाबारा दिवस लोटल्यावर एकदाचें उत्तर आलें. त्यांत, तेथें

मराठी ग्रंथ ... ठाणे

घडलेलें सगळें वर्तमान लिहिलें होतें. तें पाहून त्या मुलाला फार समाधान वाटलें. आणि आपल्या आईला आपले हातून अगदीं आणीबाणीच्या वेळीं यथायोग्य साह्य मिळालें, ह्याबद्दल त्यानें परमेश्वराचे आभार मानिले.

असे कितीएक दिवस गेल्यावर एके वेळीं, उद्धवराव आनंदरावास ह्मणाला, " आनंदराव, हें एवढें घड्याळ घेऊन काशिनाथ वैद्यांकडे जा, हें त्यांना दे, आणि, ते देतील तें घेऊन ये. " त्याप्रमाणें त्या वैद्याकडे तें घड्याळ घेऊन तो गेला, आणि त्यास त्यानें तें दिलें. तें हातांत घेऊन तो वैद्य त्या मुलाकडे पाहून ह्मणाला, " कायरे बाबा, आतां तुला माझें घड्याळ पाहिजे ना ? "

**आनंद०**—होय. तें साफ करावयाचें आहे, असें उद्धवराव ह्मणत होते.

**काशिना०**—होय. पण, तें दिलें तर माझें अडेल. कसें करावें ? तुला घड्याळाचें काम येतें ना ? तें तुला येथच्या येथें आतां नाहीं का साफ करितां येणार ?

**आनंद०**—होय, आधीं मी पाहातों, आणि मग सांगतों.

असें ह्मणून तो तें घड्याळ उघडून फार बारीक नजरेनें त्यांतलीं चक्रें वगैरे पाहात होता, तेव्हां काशिनाथ वैद्याची दृष्टि सहज त्याच्या डोळ्यांकडे गेली; आणि त्यांत त्याला कांहीं चमत्कारिक दिसलें, ह्मणून तो त्यांकडे विशेष बारीक दृष्टीनें पाहूं लागला, आणि त्याला ह्मणाला, " आनंदराव, तूं या घड्याळाची जशी प्रकृति पाहिलीस तशी तूं आपल्या डोळ्यांची प्रकृति मला पाहूं देशील काय ? "

हें ऐकून आनंदराव किंचित चकित होऊन वैद्याच्या तोंडाकडे पाहून ह्मणाला, "काय ह्मटलें आपण ? आपण माझे डोळे पहातां ? बरें आहे. "

आनंदरावाचे डोळे न्याहाळून पाहिल्यावर, त्यास त्यांविषयीं त्यानें आणखी कांहीं हकीकत विचारली. तेव्हां त्यास त्यानें सांगितलें, " होय. माझ्या उजव्या डोळ्यानें मला कधीं कधीं अंधुक दिसतें. पण माझे डोळे कधींही दुखत नाहींत. मी आलीकडे नेहमींपेक्षां अधिक काम करीत असतों. "

तें ऐकल्यावर, पळ दोन पळें थांबून काशिनाथ वैद्य त्याला ह्मणाला, " तुझे डोळे कधीं दुखत नाहींत तूं ह्मणतोस, पण तुझ्या उजव्या डोळ्याला एक मोठा दर्द झाला आहे. "

**आनं०**–( घाबरून ) असा कोणता दर्द, महाराज?

**काशि०**–तें माझ्यानें बरोबर सांगवत नाहीं. कां कीं, त्याची पुरती माहिती मला नाहीं. पण तूं, आतां असाच शिवाप्पा नेत्रवैद्याकडे जा आणि त्याला आपले डोळे दाखीव. घड्याळ नेण्याचें काम राहूं दे तसेंच. उद्यांपरवां मी उद्धवरावाला भेटेन आणि मग त्याविषयीं मी त्याला सांगेन. तूं आतां शिवाप्पाकडे जा आधीं कसा.

नंतर तो जो तेथून उठला, तो अत्यंत चिंताक्रांत होऊन नीट आपल्या दुकानांत आला. तेव्हां त्याचा चेहरा उतरला होता, आणि तो भ्यालयासारखा दिसत होता. त्याजकडे पाहून उद्धवराव त्याला ह्मणाला, " आनंदराव, कायरे झालें आहे तुला? तूं असा कां दिसतोस? "

त्याचें उत्तर आनंदरावाच्यानें देववेना. कारण त्याचा कंठ भरून आला होता. तरी, थोडें अवसान धरून तो ह्मणाला, "माझ्या डोळयांत कांहीं मोठा दर्द आहे, असें काशिनाथ वैद्य ह्मणतात." हें तो बोलला तेव्हां त्याच्या डोळयांतून पाणी वाहात होतें.

**उद्ध०**–काय? दर्द? तुझ्या डोळ्यांत?

**आनं०**–होय. माझ्या डोळ्यांत मोठा दर्द आहे, असें ते ह्मणतात, आणि त्यांनीं मला आतांच्या आतां शिवाप्पाकडे जायाला सांगितलें आहे. काय करावें?

**उद्ध०**– नाहीं नाहीं; इतकें घाबरण्याचें कारण नाहीं. भिऊं नको. तूं आलीकडे फार काम करीत होतास, ह्मणून तसें कांहीं थोडेंसें झालें असेल. कांहीं चिंता नाहीं. आतां फार काम करूं नको; ह्मणजे सगळें यथास्थित होईल.

हें बोलणें झाल्यावर दोन दिवसांनीं काशिनाथ वैद्य उद्धवरावाकडे आला, आणि त्याला ह्मणाला, " आनंदरावाला शिवाप्पाकडे पाठविण्यास एक घटकेचा देखील विलंब करूं नये. त्याच्या डोळ्यांची गति मला बरी दिसत नाहीं. "

तर बाबा निघून गेल्यावर, उद्धवरावानें लागलीच एक चिठी लिहून आनंदरावाच्या हातांत दिली, आणि त्यास सांगितलें कीं, "ही चिठी घेऊन शिवाप्पाकडे जा, ह्मणजे तो इतर कामें एकीकडे ठेवून आधीं तुझे डोळे पाहील, आणि तुला काय सांगावयाचें तें सांगेल."

ती चिठी घेऊन तो मुलगा शिवाप्पाकडे गेला. तेव्हां शिवाप्पाला भेटावयास दुसरे एक दोन मोठे नामांकित शस्त्रवैद्य तेथें आले होते. चिठी वाचिल्याबरोबर, शिवाप्पानें आनंदरावाला पुढें बोलाविलें. त्यानें त्याचे डोळे फार न्याहाळून पाहिले, आणि क्षणभर विचार करून ह्मटलें, "बाबा मुला, तुझा उजवा डोळा अगदीं खराब झाला आहे, आणि त्याचा प्रादुर्भाव डाव्यालाही लागला आहे. उजवा डोळा तर अगदीं लवकर जाईल असें वाटतें. त्याला कधीं कांहीं लागलें होतें काय?

**आनं०**-अलीकडे कांहीं लागल्याचें मला आठवत नाहीं. पण वर्ष दोनवर्षांपूर्वीं एकदा खेळत होतों, तेव्हां एका विटीचा टोला निसुटता लागला होता.

**शिवा०**-तेंच तें, तरी मला वाटलेंच कीं, असा प्रकार जो आहे, तो कसला तरी धक्का लागल्यावांचून व्हावयाचा नाहीं. बरें आतां तुला मी साफ सांगतों. तुझ्या उजव्या डोळ्याची आशा आतां धरायास नको. तो लवकर जाईल. पण, तूं जर पडदा काढण्याचें दुःख सोशिशील, तर डावा डोळा बचावण्याचा प्रयत्न मी करीन, बोल काय तें.

हें बोलणें कानीं पडतांच आनंदरावाचे हातपाय गळाले, त्याचें तोंड उतरलें, आणि त्याच्या डोळ्यांस पाणी आलें. तो कांहींच बोलेना, आणि तो इतका दुःखी झाला, हें पाहून शिवाप्पाला फार वाईट वाटलें, आणि तो त्याला ह्मणाला, "पण तूं काम कोणतें करीत असतोस?"

**आनं०**-मी घड्याळें करावयास शिकत आहें.

**शिवा०**-तो धंदा त्वां आधीं सोडून दिला पाहिजे. कां कीं, तुझा एक डोळा तर तूं गेलाच समज; आणि दुसरा आह्मी जो नीट

करण्याचा प्रयत्न करूं ह्मणतों, तो तरी घड्याळजीच्या उपयोग ण्यासारखा बरा व्हावयाचा नाहीं.

आ०—तो सोडून मी काय करूं?

शि०—बरें तर. तूं बारा महिन्यांच्या आंत अगदीं आंधळा होशील. पाहा, तूं जर हा बारीक काम करण्याचा धंदा सोडून देऊन, पडदा काढण्याचें दुःख सोशिशील, तर मात्र तुझा डावा डोळा कांहीं बरा राहण्याची आशा आहे. ती देखील आशा आहे, असें मी ह्मणतों, खातरी आहे असें माझ्यानें ह्मणवत नाहीं. आतां काय तो आपला विचार सांग.

आनंदरावाला असें वाटलें कीं, "पडदे काढतांना ज्या वेदना मला सोसाव्या लागतील, त्यांच्या योगानें माझा प्राण निघून जाईल, आणि हें माझें वर्तमान आईच्या कानीं पडलें ह्मणजे तिजवर जसे दुःखाचे डोंगर कोसळतील. काय व्हावयाचें असेल तें होवो; पडदे काढवावयाचे नाहींत." असा निश्चय करून, आणि त्याप्रमाणें शिवाप्पास सांगून, तो बिचारा गरीब मुलगा, अत्यंत दुःखी होऊन, परत उद्धवरावाकडे आला.

---

## भाग पांचवा.

शिवाप्पाकडे झालेली सगळी हकीकत आनंदरावाच्या मुखानें ऐकून उद्धवरावासही फार दुःख झालें. त्याला त्याची दया आली, आणि तो त्याला ह्मणाला, "कांहीं भिऊं नको; आमचे येथें तूं खुशाल कांहीं दिवस राहा; शिवाप्पाचा अजमास कदाचित खोटा ठरेल; तसें झालें तर बरेंच झालें; आणि तसें नच झालें, तर मग पुढचें पुढें, त्याची खंती आतांपासून करूं नको." तें ऐकून आनंदरावाला किंचित बरें वाटलें.

गांठोडें पोंचल्याबद्दलचें जें पत्र रखमाबाईकडून आलें होतें, त्यांत, आनंदरावास कांहीं दिवस राहावयास घरीं बोलाविलें होतें. त्याप्रमाणें त्यानें उद्धवरावास विचारून जाण्याची तयारी केली.

तत्पूर्वींच, उद्धवरावानें माधवरावास त्याच्या डोळ्यांची सगळी हकीकत कळविली होती, आणि त्यानें ती रखमाबाईच्या कानावर घातली होती; तेणेंकरून, तो दृष्टीस पडण्यापूर्वींच त्याजविषयींचें दुःख तिच्या पोटांत उभें राहिलें होतें, आणि तो एकदा केव्हां भेटेल, असें तिला झालें होतें.

तो आनंदराव, प्रातःकाळीं प्रहर दिवसाच्या सुमारास आपल्या घरीं पोहोंचला. तेव्हां त्याची आई झाडसारवणाच्या कामांत गुंतली होती. मुलगा दृष्टीस पडतांच रखमाबाईच्या नेत्रांतून घळघळां पाणी वाहूं लागलें; तिनें आपली मान खालीं घातली, तिचा कंठ दाटून आला, आणि तिच्या तोंडांतून शब्द बाहेर निघेना. आईची अशी अवस्था पाहून आनंदरावाला जो हुंदका आला, तो त्याच्यानें आवरेना. तो रडूं लागला. तेव्हां त्याच्या जवळ येऊन त्याला पोटाशीं धरून रखमाबाई उसासा टाकून ह्मणाली, "बाळा, आनंदा, कष्टी होऊं नको, कष्टी होऊं नको! काय करावें? जो आपला भोग आहे, तो आपणाला भोगला पाहिजे. असा प्रसंग येईल, असें कधीं मनांत देखील नवतें आलें रे देवा! तुझा उजवा डोळा कसारे झाला आहे हा! आतां काय करूं? बाळा, आनंदा, तुला आतां अगदीं दिसेनासें होणार ना? बरें! इच्छा परमेश्वराची! तो ठेवील तसें राहणें भाग आहे!"

अशी ती बाई घटकाभर शोकग्रस्त होऊन अगदीं स्तब्ध बसली, आणि मग किंचित सावध होऊन ह्मणाली, "बाळा आनंदा, आतां तूं दुःख करूं नको. आणि उगीच चिंताक्रांत होऊं नको. जें संकट येत आहे, तें कांहीं टळत नाहीं. मग उगीच क्लेश कां? राहा तूं आतां घरींच माझेजवळ. जी आह्मी ओली कोरडी भाकर खाऊं, तींतलीच चतकर तूं खा."

**आनं०**–नाहीं नाहीं आई. मी घरीं राहून सगळा भार का तुजवर घालूं? नाहीं मी घरीं राहणार नाहीं.

**रख०**–नाहींरे आनंदा. तुझा मला कधीं भार वाटावयाचा

नाहीं. परमेश्वर जसें आमचें चालवितो, तसेंच तुझें चालवील. तुला आतां कांहीं उद्योग करितां यावयाचा नाहीं, ह्मणून मी ह्मणतें रे.

**आनं०**–आई. नाहीं. तूं तसें ह्मणूं नको. निर्वाहापुरतें अन्नवस्त्र मिळविण्यास मला कांहीं तरी उद्योग केला पाहिजे. माझे डोळे जातील, त्यांबरोबर पोट नाहींना जाणार? तें भरलेंच पाहिजे. पण, आईग, माझ्या सगळ्या आशा फुकट गेल्या बरें! काय करावें? देवाची मर्जी!

**रख०**–तरी, बाळा, एक गोष्ट तूं नेहमीं लक्षांत ठेव. ती ही कीं, देवाची करणी अगाध असते. तिचा पार माणसांस लागत नाहीं. तो आणि तो जें करितो, तें चांगलेंच करितो, वाईट कधीं करीत नाहीं. त्यानें जें हें मोठें संकट आपणांवर आणिलें आहे, त्यांतच आमचें कांहीं चांगलें नसेल ह्मणून कशावरून? अगदीं निराश होऊं नको.

**आनं०**–आई, तूं ह्मणतेस तें कसें बरें असेल? ह्या संकटांत आपलें बरें तें काय असावयाचें आहे? मला तर कांहीं दिसत नाहीं.

**रख०**–बरें आतां, तें असूंदे परतें. तें जें तुला दिसत नाहीं, हें तुझ्या अज्ञानाचें फळ आहे. परमेश्वरावर विश्वास ठेवून स्वस्थ बैस. काळजी करूं नको. आपली सर्वांची चिंता त्याला आहे. ह्यापेक्षांही मोठीं संकटें ज्यांवर आलीं होतीं, त्यांस त्यानें मोठ्या चमत्कारानें त्यांतून पार पाडिल्याच्या गोष्टी कितीएक आहेत. अरे, हरिश्चंद्र आणि तारामती ह्यांजवर केवढें संकट आलें होतें बरें! त्यांतूनही देवानें त्यांस पार पाडिलें कीं नाहीं? "देव करी तरी काय एक नोहे, दगडाची नाव तारीयेली."

तें आईचें बोलणें ऐकून आनंदरावाला थोडें समाधान वाटलें. तो कांहीं दिवस घरीं राहिला. तो आपल्या आईस पराकष्ठेचे कष्ट करितांना पाही, तेव्हां त्याचा जीव अगदीं थोडा थोडा होई. तरी, तो आपलें दुःख कधींही बाहेर दाखवीत नसे. जाण्याच्या आदल्या दिवशीं तो आपल्या आईला ह्मणाला, "आतां मला उद्यां जायाचें. उद्धवरावांच्या साह्यानें कोठें तरी लहान मोठी चाकरी मी मिळवीन, आणि आपला चरितार्थ चालवीन. घड्याळजीचें काम मला व्हाव-

याचें नाहीं खरें. पण कारखान्यांतलें इतर काम ह्मणजे सामान आणणें, पोंचविणें, पैसा वसूल करणें, वगैरे काम मी सहज करीन; आणि असें काम पाहून देण्याविषयीं उद्धवरावांनीं मला वचन दिलें आहे."

दुसरे दिवशीं आईचा निरोप घेऊन आनंदराव निघाला, तो पुण्यास आला. त्याला दिवसेंदिवस कमी दिसूं लागलें, ह्मणून उद्धवरावानें त्यास घड्याळांचें काम सांगायाचें बंद केलें, आणि त्याला दुसरी कोठें सोय पाहाण्याची खटपट चालविली. त्यानें पुष्कळ मित्रांस त्याविषयीं लिहिलें; परंतु "सध्या गरज नाहीं" अशीं उत्तरें सर्वांकडून आलीं. उद्धवरावाच्या येथें जेऊन, कांहींएक उद्योग न करितां दिवस घालविणें, हें आनंदरावास फार कठीण जाऊं लागलें. ह्मणून त्यानें स्वतःच आपणाकरितां कोठें सोय पाहाण्याचा निश्चय केला. त्याकरितां तो दररोज दोन तीनदा बाहेर जाई, आणि मोठमोठ्या रस्त्यांतून फिरून, जे मोठे लोक जात येत, त्यांच्या तोंडाकडे आशाळभूत मुद्रेनें टक लावून पाही. परंतु, त्याला कोणी पुसेना; तेव्हां तो अगदीं कंटाळला, आणि पुढें काय करावें, ह्याच्या विचारांत पडला. असा चिंतातुर होऊन एके दिवशीं सकाळीं तो बुधवारच्या रस्त्याच्या वरच्या कोंपऱ्यावर उभा राहिला असतां, आणि तेथें त्याला जो सारंगीचा मधुर स्वर ऐकूं येत होता, त्याचा ताल धरून त्यांत गुंगत असतां, करीमखान ह्मणून कोणीएक मोठा नामांकित सतार वाजविणारा आणि सतारी तयार करून विकणारा मनुष्य त्याच्याजवळून चालला. त्यानें आनंदरावाच्या तोंडाकडे पाहिलें. तेव्हां त्याची चर्या त्याला किंचित् आनंदी दिसली खरी; पण त्याच्या मनांत जी काळजी होती, तीही तिजवर स्पष्टपणें त्याच्या दृष्टीस पडली; आणि तो मुलगा चांगला असावा, असें त्याच्या मनांत आलें. तेव्हां त्यानें त्याला विचारिलें, "कां मुला, तुला काय पाहिजे ?"

**आनं०**—महाराज मला कांहीं सोय पाहिजे.

**करी०**—पण तुला लिहितां वाचतां कांहीं येतें काय ? तुला जमाखर्च लिहितां येईल काय ?

**आनं०**-होय. तें काम मी करीन, महाराज.

**करी०**-बरें तर. तूं उद्यां आमच्या कारखान्यांत ये सकाळीं.

तें ऐकून आनंदरावाला मोठा हर्ष झाला, आणि तो करीमखानास फार लवून सलाम करून ह्मणाला, "बरें आहे, मी उद्यां सात वाजतां येईन."

त्याप्रमाणें तो तेथें गेला, आणि करीमखानानें त्याला कांहीं वसूल बाकीचें काम सांगितलें. तें तो मोठ्या दक्षतेनें आणि प्रामाणिकपणानें करूं लागला. तेव्हां त्याजवर करीमखानाची मर्जी बसली. आणखी, आनंदराव ह्यास परमेश्वरानें उपजत कांहीं वाद्यज्ञान दिलें होतें, त्याच्या योगानें, आणि नित्याच्या सहवासानें, सतार लागली कोणती, आणि लागली नाहीं कोणती, तें त्याला चांगलें कळूं लागलें. तेव्हां तर तो करीमखानाला फार आवडूं लागला, आणि त्यानें त्याला सतार वाजविण्यास शिकविण्याचा आरंभ केला. तेव्हां, आपली प्रार्थना परमेश्वरानें ऐकिली, असें आनंदरावाला वाटलें, आणि त्याबद्दल तो त्याचे आभार मानूं लागला.

करीमखान थोडासा पगार देत असे, त्यावर आनंदराव भाजीभाकर खाऊन निर्वाह करी. असे आठ दाहा महिने लोटले. त्या मुलाला दिवसानुदिवस कमी कमी दिसूं लागत होतें, त्यामुळें त्याला फार वाईट वाटे; पण, त्याच्या इच्छेप्रमाणें त्याला सतार चांगली वाजावेता येऊं लागली, येणेंकरून तें दुःख तो वारंवार विसरत असे. असें चाललें असतां एके दिवशीं एक वर्तमानपत्र करीमखान ह्यानें त्याच्या हातीं दिलें, आणि ह्मटलें, "ह्यांत ती आमची जाहिरात त्यांनीं छापिली आहे कीं नाहीं, पाहा बरें." तें तो पाहात असतां, 'मृत्यु' ह्या सदराखालीं, अमृतराव अतिमद्यपानानें मरण पावल्याचें लिहिलें होतें, तें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां त्याला रडें कोसळलें. तो आपलें तोंड खालीं करून शोक करूं लागला. त्याला, 'काय झालें, काय झालें' ह्मणून करीमखान विचारूं लागला; परंतु, त्याच्या तोंडांतून अक्षर बाहेर निघेना. तेव्हां त्यानें तें पत्र त्याचे हातांतून घेऊन वाचून पाहिलें, आणि ह्मटलें, "अरे रे मोठा घात

झाला! परमेश्वराची इच्छा! आनंदराव, उगा राहा; शोक करूं नको. मृत्युलोकची वस्ती आहे. आपणां सर्वांस केव्हांना केव्हां तरी जायाचें आहे. आतां जरा धीर धर; सावध हो; घावरूं नको; तुला लवकर घरीं जाण्याची तयारी केली पाहिजे. तूं उद्यां नीघ मोठ्या पाहांटेस."

हें वर्तमान उद्धवरावास कळल्यावर तोही लागलाच आनंदरावाच्या समाचाराला आला, आणि त्यानें त्याचें पुष्कळ सांत्वन केलें; आणि, सांगितलें कीं, "तूं उद्यां सकाळीं निघण्यापूर्वीं तुला भेटण्यास आमचीं माणसें येणार आहेत. त्यांची भेट झाल्यावांचून जाऊं नको."

त्याप्रमाणें उद्धवरावाची बायको आनंदरावाच्या बिऱ्हाडीं आली, तेव्हां दोन घटका रात्र होती; आणि तोही उठला नव्हता. नंतर त्याच्या निघण्याची तयारी करण्यास तिनें तेथें समयी लावविली, आणि मग त्याला हाक मारून उठविलें. तो जागा होऊन उभा राहिला, आणि डोळे उघडून पाहूं लागला तों त्याला सगळा अंधेर दिसला. तेथें दिवा तेवत होता, तरी त्याला तो उजेड दिसेना. तो मोठ्या घाईनें ह्मणाला, "आतां आधीं दिवा लाविला पाहिजे. येथें कांहीं दिसत नाहीं."

**उद्धवरावाची बायको**–अरे, आनंदराव, असें काय करतोस? ही तुझ्यापुढें समई तेवते आहेना एवढी मोठी!

**आनं०**–नाहीं बाईसाहेब, नाहीं. मला दिव्याची ज्योत देखील दिसत नाहीं! झाले, गेले माझे डोळे! झालों मी आंधळा! आतां काय करूं? देवा असें कसें रे केलेंस? आतां माझी गति कशी होईल? आतां तूं माझा सांभाळ कर?

हें सगळें पाहून, उद्धवरावाची बायको अत्यंत दुःखी होऊन तेथून निघून गेली.

त्याच्या डोळ्यांस कांहीं उपचार करावा, ह्मणून करीमखान ह्यानें शहरांतल्या एका उत्तम नेत्रवैद्याला लागलेंच बोलावून आणिलें,

आणि त्याला चांगलें बक्षीस देण्याचें कबूल केलें; परंतु तो वैद्य ह्मणाला, " कांहीं केलें तरी हे डोळे यावयाचे नाहींत. मग उगाच श्रम कां करावे ? "

तें ऐकून आनंदरावाचे हातपाय मोडले. त्याला अतिशयित दुःख झालें, तसें तेथल्या मंडळीलाही त्याकरितां पराकाष्ठेचें वाईट वाटलें. परंतु उपयोग काय ? दोन दिवस लोटल्यानंतर हें सगळें वर्तमान रखमाबाईस करीमखान ह्यानें पत्र पाठवून कळविलें. ती आपल्या भ्रताराच्या मृत्यूच्या योगानें अत्यंत दुःखित होऊन, इतकी आजारी आणि अशक्त झाली होती कीं, ती फार दिवस जगावयाची नाहीं, असें तिच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांस खचीत वाटलें; त्यांत मुलगा आंधळा झाल्याचें वर्तमान तिला समजलें. मग काय विचारावें ? तिच्या शोकास आणि दुःखास अंत्र नाहींसा झाला. तरी ती बायको मोठ्या धिराची, आणि परमेश्वर जें कांहीं करतो तें चांगलेंच करितो असें खचीत समजणारी, अशी होती. त्यामुळें तिनें तें सगळें दुःख गट् केलें.

पुढें दोन तीन दिवसांनीं पुण्याच्या मंडळीनें, डोळींत घालून आनंदरावाला त्याच्या घरीं पोहोंचतें केलें. त्याच्या आईची आणि त्याची प्रथम गांठ पडली, तेव्हां जो आकांत तेथें झाला, त्याचें वर्णन किती करावें ? तरी, ती शेवटीं ह्मणाली, " बाळा आनंदा, देव कधीं कोणाचें वाईट करीत नाहीं. तो जें कांहीं करितो, तें चांगलेंच करितो. तो अत्यंत दयाळू आहे. "

**आनं०**—होय, आई आतां त्याविषयीं मला कांहीं शंका राहिली नाहीं. तो अत्यंत दयाळू आहे, तो आमच्या प्रार्थना ऐकतो, आणि तो जें कांहीं करितो, तें चांगलें करितो, अशी माझी पूर्ण खातरी झाली आहे. त्यानें कृपा करून माझी हौस पुरविली होती. पण काय—आतां सगळें जागच्या जागीं राहिलें !

**रख०**—होय मुला, आपली माणसांची स्थिति वारंवार बदलते, पण देवाच्या दयाळुत्वांत आणि कृतींत कधीं अंतर पडत नाहीं. तो नित्य दयाळू आहे. अरे, त्याची करणी किती चमत्कारिक ह्मणून सां-

गावी ! ? तिजविषयीं कोणास तर्क देखील करितां यावयाचा नाहीं. पाहा :, तो विश्वंभर दुःखितांचा सांभाळ दुःखितांकडून करवितो.

**आनं०**–आई, तूं ह्मणतेस तें मला समजत नाहीं.

**रख०**–ऐक बाबा, तुझा बाप वारला, त्या वेळेसच माझा प्राण जावयाचा; किंवा, फार तर आणखी महिना पंधरा दिवसांची सोबतीण मी होतें, असें स्वतः मला वाटलें होतें, आणि सगळीं माणसेंही तसेंच ह्मणत होतीं. पण, तुझें हें असें झाल्याचें मला कळल्यापासून, माझ्या स्थितींत फरक पडला. तूं असा पंगू झालास, ह्यास्तव तुझें रक्षण आतां मला केलें पाहिजे, असें माझ्या मनांत गेऊन, त्याविषयीं मी विचार करूं लागल्यें. तेव्हांपासून मला नराा नवा जीव भरल्यासारखा वाटला आहे; आणि त्या वेळेपासून मला त्या दुःखाचा केव्हां केव्हां थोडा थोडा विसर पडतो. तुझे डोळे गेले ह्मणून तुझा सांभाळ करण्यास देवानें मला नवी शक्ति दिल्यासारखी झाली आहे. अशी त्याची लीला अगाध आहे. तुकाराम महाराजांनीं एका अभंगांत ह्मटलें आहेः—

**माय वाप वंधु सोयरा सांगाती,**
**तूंचि माझी गती गणगोत. १.**
**शरण आलीं त्यांचीं निवारिलीं दुरितें,**
**तारिले पतित असंख्यात. २.**
**इतर कोण जाणे पावले विश्रांति,**
**न येतां तुजप्रती शरणागत. ३.**
**तयांमध्यें ठेवीं मज नारायणा,**
**लक्षुमीरमणा सोइरिया. ४.**

हें खरें आहे. असेंच आपण अनाथांनीं त्यास निरंतर ह्मणावें, ह्मणजे तो करुणा करील. अरे आनंदा, आईबाप सोयरीं धायरीं केवळ ह्या लोकीं मात्र उपयोगीं पडतात. पण देव भक्तांस परलोकींही उपयोगी पडतो. त्याविषयींही महाराजांनीं ह्मटलें आहे:—

मायबापाची उपमा,
तुज देऊं मेघश्यामा. १.
तेही साजेना पाहतां,
जीवलगा पंढरिनाथा. २.
माय पाळी संसारीं,
परलोकीं राहे दुरी. ३.
तैसा नव्हेसी अनंता,
काळावरी तुझी सत्ता. ४.
तुका ह्मणे नारायणा,
तुह्मां बहुत करुणा. ५.

**आनं०**–खरें आहे आई. त्याला सर्वांची काळजी आहे. बाबा गेले, त्यांच्या मागें जर तूं जातीस, तर ह्या आंधळ्याला कोणी सांभाळतें? देव जें करितो तें चांगलें करितो, हें मला आतां पूर्णपणें समजलें आहे.

**रख०** ज्ञाला, आनंदा, हें तुला पूर्णपणें समजलें, हा तुला मोठा लाभ झाला, असें तूं समज. अरे, आपण सोनें विकत घेतेवेळीं, तें खरें आहे कीं खोटें आहे, हें पाहाण्याकरितां जसा त्याला ताबसुलाख घालतों, तशी, आपल्या भक्तांची परीक्षा पाहाण्यास आणि त्यांचें हित करण्यास त्यांजवर नानाप्रकारचीं संकटें आणि दुःखें देव आणितो. आतां तूं आपल्यावरूनच पाहा. तुझे डोळे गेले, ही गोष्ट फार दुःखाची झाली खरी; पण, तिच्या योगानें, देवाच्या चांगुलपणाविषयीं तुझी खातरी झाली आहे, आणि त्याजकडे तुझें मन वळलें आहे, हा अप्रतिम लाभ होय. तूं त्याची भक्ति कर; त्यावर निष्ठा ठेव; त्याची प्रार्थना कर; त्याजपाशीं आपल्या पापांची क्षमा माग; आणि शेवटीं त्यानें तुला उद्धरावें, ह्मणून तूं त्यापुढें पदर पसर; ह्मणजे, तूं इहलोकीं असशील तोंपर्यंत तुला समाधान